**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**- 416 004, MAHARASHTRA
☎ PHONE : EPABX- 2609000 (10 Lines), 2693643 (9 Lines), 2693730 (9 Lines)
☎ PHONE : (Direct) 2693176, 2609067 FAX :(Direct) 0091-0231-2690655
Website : www.unishivaji.ac.in E-mail : coe@unishivaji.ac.in

Shri. Mahesh Kakade,
Controller of
Examinations

Ref. No. : SU/EXAM/ON DYR/14-15/ 2771 DATE : 15-9-2015

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
(अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र, शिक्षणशास्त्र महाविद्यालये वगळून)

विषय :- ऑक्टोबर २०१५ मध्ये होणा-या परीक्षेचे मॅन्युअल परीक्षा अर्ज, त्रुटी असलेले अर्ज, डियुडिसीमध्ये आरडीपी नसलेले अर्ज, डबल ग्रॅज्युएशन इत्यादी अर्ज भरण्याबाबतच्या शेडयुल्डनुसार उपस्थित राहण्याबाबत

महोदय/महोदया,

आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ चे ऑक्टोबर-२०१५ मध्ये होणा-या परीक्षांचे परीक्षा अर्ज भरून घेण्याबाबत यापूर्वी कळविण्यात आलेले होते. त्यामध्ये मॅन्युअल परीक्षा अर्ज, त्रुटी असलेले अर्ज, डियुडिसीमध्ये आरडीपी नसलेले अर्ज, डबल ग्रॅज्युएशन इत्यादी अर्ज भरण्याबाबतच्या शेडयुल्डनुसार एकत्रितरित्या उपस्थित राहण्यासाठी कळविण्यात येईल अशा सूचनाही देण्यात आलेल्या होत्या. त्याप्रमाणे आता महाविद्यालयांसाठी परीक्षा अर्जांच्या त्रुटी आणि परीक्षा विभागास माहिती उपलब्ध नसलेल्या अर्जांतील निकालातील त्रुटींची पूर्तता करण्यासाठी वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. संबंधित महाविद्यालयांनी त्यांच्या नांवापुढे दर्शविलेल्या तारखेस विद्यापीठ कार्यालयात परीक्षा भवन-१ मध्ये उपस्थित रहावयाचे आहे. आपापल्या महाविद्यालयात जमा केलेल्या परीक्षा अर्जांचे परीक्षा शुल्क निर्धारित वेळेत आपण विद्यापीठाच्या खात्यावर जमा करून त्याची पावती घेतलेली असेलच. तथापि अद्यापि जर कोणत्याही महाविद्यालयाचे परीक्षा शुल्क विद्यापीठात भरणा करावयाचे राहिले असेल तर त्यांनी त्याची तांतडीने पूर्तता करावी.

सोबत पाठविलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आपापल्या महाविद्यालयातील परीक्षेचे कामकाज करणारा कर्मचारी/लिपिक यांचेसोबत मॅन्युअल परीक्षा अर्ज, त्रुटी असलेले अर्ज, डियुडिसीमध्ये आरडीपी नसलेले अर्ज, डबल ग्रॅज्युएशन इत्यादी अर्जांची स्वतंत्रपणे विभागणी (सॉर्टिंग) करून त्याची तपशीलवार यादी सोबतच्या प्रपत्रात भरून त्या त्या अर्जांवर ते प्रपत्र जोडून पाठवावे. मॅन्युअली अर्जासोबत विद्यार्थ्याचे पूर्वी उत्तीर्ण झालेले गुणपत्रक असणे आवश्यक आहे. अन्यथा असे परीक्षा अर्ज ग्राहय मानले जाणार नाहीत. या पध्दतीने मॅन्युअल परीक्षा अर्ज स्विकारून ते नंतर प्रणालीत घेण्याची कार्यवाही केवळ याच परीक्षेपुरता खास बाब म्हणून घेण्यात येणार आहेत. यापुढे अशा पध्दतीने परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अद्यापि पात्रता पूर्ण न झालेले परीक्षा अर्ज जनरेट झालेले नाहीत. तरी सर्व संबंधित महाविद्यालयांनी पात्रता विभागाशी संपर्क साधून आपापल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची पात्रता वेळेत पूर्ण करून घ्यावी. अन्यथा परीक्षा अर्ज जनरेट न झाल्यास त्यास परीक्षा विभाग जबाबदार असणार नाही.

दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे संबंधित महाविद्यालयाचे लिपिक/कर्मचारी उपस्थित न झाल्यास नंतरच्या शेडयुल्डमध्ये त्यांना घेण्यात येणार नाही व त्याची संपूर्ण जबाबदारी त्या त्या महाविद्यालयांची राहील. ऑक्टोबर-२०१५ च्या परीक्षेत कोणासही ऑड नंबरने परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

शेडयुलनुसार बोलावण्यात आलेल्या संबंधितांचा फक्त प्रवास खर्च ज्या त्या महाविद्यालयांस उपलब्ध करून देण्यात येत असलेल्या परीक्षा केंद्रासाठी ॲडव्हान्स रक्कम **A.3.P.27 :** Expenditure on Exam at centres यातून विद्यापीठ नियमानुसार संबंधित महाविद्यालयातून आदा करण्यात यावा. स्वत:चे वाहन वापरताना किंवा दुचाकी वाहन वापरणा-यांसाठी विद्यापीठ नियमानुसार देयक आदा करण्याबाबतची काटेकोर दक्षता घ्यावी. संबंधित महाविद्यालयाच्या प्रतिनिधींनी सकाळी ९.०० वाजता परीक्षा भवनमध्ये उपस्थित राहण्याचे असून उपकुलसचिव श्री. जी.आर. पळसे यांच्याशी संपर्क साधावयाचा आहे.

तरी सर्व संबंधितांना वरील सूचना देण्यात याव्यात ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
(महेश काकडे)
परीक्षा नियंत्रक

सोबत : वरिलप्रमाणे